महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५

दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२ ई-मेल : pmu@mahapocra.gov.in

NDKSP-२२०१९(२१)/१६/२०२५-DBT दि.२८/ १० /२०२५

प्रति,

१. विभागीय कृषि सहसंचालक (प्रकल्पांतर्गत सर्व)
२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (प्रकल्पांतर्गत सर्व)

विषय : नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या घटकांच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे बाबत ..

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र.नादेकृ ४६२२/प्र.क्र.९४/८-अे, दि. १४/१०/२०२४.
२. शासन निर्णय क्र.कृवपदुम-१९०४६/३६/२०२५-MAG-8A (E-११६८०५०), दि. ०८/०७/२०२५.

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागांतर्गत, जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील एकूण २१ जिल्ह्यांमधील ७,२०१ गावे निवडण्यात आली आहेत. तसेच नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, टप्पा-२ च्या अंमलबजावणीस व जागतिक बँकेसोबत करारनामा करण्यास दिनांक ०८ जुलै २०२५ च्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे. प्रकल्पाचा प्रमुख उद्देश शेतकऱ्यांना बदलत्या हवामानाशी जुळवून घेण्यासाठी सक्षम करणे व कृषी आधारित उपजीविकेची साधने उपलब्ध करून शेती किफायतशीर करणे हा आहे. बदलत्या हवामानाचा शेतीला कमीत कमी फटका बसेल यासाठी गावनिहाय नियोजन करण्यात येत असून प्रकल्पांतर्गत वैयक्तिक शेतकऱ्यांना हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब करणेसाठी विविध घटक राबविण्यात येणार आहेत. त्याअनुषंगाने सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** मध्ये नमूद केलेले घटकांच्या अंमलबजावणीसाठीच्या मार्गदर्शक सूचना या पत्रासोबत सहपत्रीत करण्यात येत आहेत.त्यानुसार प्रकल्पांतर्गत गावांमध्ये सदर घटकांची अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच उर्वरित वैयक्तिक लाभाच्या घटकांच्या मार्गदर्शक सूचना यथावकाश निर्गमित करण्यात येतील.

सोबत : घटकनिहाय मार्गदर्शक सूचना

(परिमल सिंह)
प्रकल्प संचालक
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प,मुंबई

प्रत- १. मा. अपर मुख्य सचिव (कृषि), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे.

# संरक्षित शेती

## (हरितगृह / शेडनेटगृहातील लागवड साहित्य)

हवामान बदलाचा राज्याच्या शेतीवर विपरीत परिणाम दिसून येत असून, भविष्यात देखील सदर परिणामांची व्याप्ती वाढणार असल्याचे राज्याच्या हवामान बदलाविषयक कृती आराखडयामध्ये नमूद केले आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांना गेल्या काही वर्षांपासून मोठया दुष्काळास सामोरे जावे लागत असून भू-गर्भातील पाणीसाठयावर व जमिनीच्या आरोग्यावर त्याचा विपरित परिणाम होत आहे. परिणामी शेतीमधील पिकांची उत्पादकता घटत आहे. या प्रतिकूल परिस्थितीमध्ये अल्प व अत्यल्प भू-धारक शेतक-यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास शेतकऱ्यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाचा जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प सुरु करण्यात आलेला आहे.

भारतीय शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढत असून शाश्वत व उत्पादक शेतीसाठी पर्यायी व नियंत्रित वातावरणातील लागवडीला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. शेडनेटगृह आणि हरितगृहाच्या मदतीने हवामानातील प्रतिकूल बदल, पर्जन्यमानातील अनिश्चितता, कीड व रोगांचा प्रादुर्भाव, अतिउष्णता किंवा थंडी यापासून संरक्षण मिळते. यामुळे उत्पादनाचा दर्जा व प्रमाण दोन्ही वाढते, पाणी व खतांचा कार्यक्षम वापर शक्य होतो आणि वर्षभर लागवडीस चालना मिळते. फलोत्पादन क्षेत्रात संरक्षित शेती पध्दतीचा अवलंब केल्याने फुलपिके व भाजीपाला पिकाचे अधिक उत्पादन, उत्पादकता व उच्च दर्जाचे उत्पादन मिळून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होते. फुलपिके, भाजीपाला व रोपवाटीकांसाठी शेतकरी हरितगृह, शेडनेटगृह, प्लास्टिक टनेल इत्यादींचा वापर करतात. लागवडीसाठी आवश्यक असलेले साहित्य योग्य प्रकारे निवडल्यास आणि व्यवस्थापन पद्धतींचे पालन केल्यास कृषि उत्पादनात मोठ्या प्रमाणावर सुधारणा साधता येते. हरितगृह व शेडनेटगृहाच्या वापरामुळे फुले व भाजीपाला पिकांचे योग्य गुणवत्तेच्या मालाचे उत्पादन होत असून त्यापासून शेतकऱ्यांना कमी क्षेत्रामध्ये अधिक चांगले उत्पादन मिळत असल्यामुळे **"हरितगृह व शेडनेटगृहातील लागवड साहित्य"** शेतकऱ्यांना हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास मदत करतात.

### उद्दिष्टे:

१. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पामध्ये समावेश करण्यात आलेल्या गाव समूहातील शेतकऱ्यांना हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम बनविणे.
२. शेतकऱ्यांना उच्च दर्जाच्या व उच्च प्रतीच्या निर्यातक्षम पिकांच्या लागवडीसाठी आर्थिक सहाय्य करणे.
३. ग्रामीण भागातील युवकांना कृषि क्षेत्रात स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणे.
४. फलोत्पादन क्षेत्रात बिगर हंगामी पिके घेण्यासाठी व उच्च तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे.
५. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून आत्मनिर्भर शेती व आर्थिक स्थैर्य निर्माण करणे.

### लाभार्थी निवडीचे निकष:

१. प्रकल्पांतर्गत ५ हेक्टर पर्यंत जमीनधारणा असलेले शेतकरी या घटकासाठी पात्र राहतील.
२. लाभार्थीने यापुर्वी कोणत्याही शासकीय योजनेतंर्गत (एन.एच.एम./ एन.एच.बी./ आत्मा/ आर.के.व्ही.वाय./ जलसुधार प्रकल्प /नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प/इतर) लाभ घेतला असल्यास सर्व योजना

मिळून प्रति लाभार्थी जास्तीत जास्त ४००० चौ.मी. क्षेत्र मर्यादेपर्यंतच अनुदान लाभ देय आहे, त्यानुसार हरितगृह व शेडनेटगृह लागवड साहित्य प्रकाराच्या प्रति लाभार्थी ४००० चौ.मी. क्षेत्र मर्यादेच्या अधिन राहून या पूर्वी लाभ घेतलेले क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्रासाठी या योजनेचा लाभ देता येईल.

३. यापूर्वी शासनाच्या योजनेतून लाभ घेतलेले क्षेत्र पुनश्चः अनुदानासाठी पात्र राहणार नाही.

४. ग्राम कृषि विकास समितीची (GKVS) मान्यता असलेल्या अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना, अनु. जाती/ जमाती, महिला, दिव्यांग व इतर शेतकरी या प्राधान्यक्रमाने निवड करून लाभ देण्यात येईल.

## अर्थसहाय्य:

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत हरितगृह व शेडनेटगृहामधील लागवड साहित्य या घटकासाठी **आर्थिक मापदंडाच्या ५० टक्के अथवा प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के यापैकी जे कमी असेल** ते अर्थसहाय्य लाभार्थींना देय राहील.

## सर्वसाधारण सूचना:

- संरक्षित शेती या घटकांतर्गत शेडनेटगृहामध्ये सिमला मिरची, टोमॅटो, ब्रोकोली, काकडी, चेरी टोमॅटो, रेड कॅबेज, लेट्युस, खरबूज व मिरची या भाजीपाला पिकांसाठी अनुदान अनुज्ञेय राहील.
- हरितगृहामध्ये (पॉलीहाऊस) सिमला मिरची, टोमॅटो, ब्रोकोली, काकडी, चेरी टोमॅटो, रेड कॅबेज, लेट्युस, खरबूज व मिरची या भाजीपाला पिकांसोबतच ॲन्थुरियम (कोको शेलमध्ये), ऑर्किड (कोको शेलमध्ये), कार्नेशन व जरबेरा या उच्च दर्जाच्या फुलपिक लागवडीसाठी अर्थसहाय्य देय राहील.
- शेडनेटगृहामध्ये व हरितगृहामध्ये (पॉलीहाऊस) भाजीपाला पिकांच्या लागवडीसाठी लागवड साहित्य (रोपे) व प्लास्टिक आच्छादन या बाबी अनुदानास पात्र राहतील.
- हरितगृहामधील (पॉलीहाऊस) फुलपिकांच्या लागवडीसाठी फक्त लागवड साहित्य (रोपे) या बाबीसाठी अर्थसहाय्य देय राहील.
- **लाभार्थीस शेडनेटगृह/ हरितगृहामधील (पॉलीहाऊस) भाजीपाला लागवड अथवा हरितगृहामधील फुलपिक लागवड या दोन्हीपैकी एकाच घटकाचा लाभ घेता येईल.**
- शेडनेटगृह/ हरितगृहामध्ये लागवड करावयाच्या (सिमला मिरची, टोमॅटो, ब्रोकोली, काकडी, चेरी टोमॅटो, रेड कॅबेज, लेट्युस, खरबूज व मिरची) भाजीपाला पिकांच्या लागवड साहित्यासाठी कमीत कमी १००० चौ.मी. व जास्तीत जास्त ४००० चौ.मी. क्षेत्र मर्यादेत खालीलप्रमाणे अनुदान देय राहील.
- मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन झाल्याचे आढळून आल्यास संबंधित अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.
- उपरोक्त मार्गदर्शक सूचनांमध्ये नमुद लाभार्थ्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यात गंभीर त्रुटी आढळून आल्यास अथवा प्रकल्पांतर्गत प्राप्त लाभाचा गैरवापर केल्याचे सिद्ध झाल्यास अर्जातील आणि हमीपत्रातील अटी व शर्तीनुसार संबंधित लाभार्थ्यावर कारवाई होऊ शकते, याबाबत लाभार्थ्यास जाणीव करून द्यावी.
- सदर मार्गदर्शक सूचनांमधील घटकाचा लाभ जास्तीत जास्त गरजू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी घटकाची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात यावी.

हरितगृह/ शेडनेटगृहातील भाजीपाला पिकाच्या लागवडीसाठी खर्चाचे मापदंड:

| बाब | प्रति चौ.मी. क्षेत्रासाठी भाजीपाला लागवड साहित्य खर्च (रु.) | क्षेत्र मर्यादा (चौ. मी.) | आर्थिक मापदंड रु. | देय अनुदान मर्यादा रु. (आर्थिक मापदंडाच्या ५० % अथवा प्रत्यक्ष खर्चाच्या ५० % यापैकी जे कमी असेल ते अनुदान ग्राह्य) |
|---|---|---|---|---|
| लागवड साहित्य (रोपे) | १८ | १००० | १८,००० | ९,००० |
| | | २००० | ३६,००० | १८,००० |
| | | ३००० | ५४,००० | २७,००० |
| | | ४००० | ७२,००० | ३६,००० |
| प्लास्टिक आच्छादन | १४ | १००० | १४,००० | ७,००० |
| | | २००० | २८,००० | १४,००० |
| | | ३००० | ४२,००० | २१,००० |
| | | ४००० | ५६,००० | २८,००० |
| **एकूण खर्च, रु.** | **३२** | **१०००** | **३२,०००** | **१६,०००** |
| | | **२०००** | **६४,०००** | **३२,०००** |
| | | **३०००** | **९६,०००** | **४८,०००** |
| | | **४०००** | **१,२८,०००** | **६४,०००** |

हरितगृह व शेडनेटगृहामधील भाजीपाला पिकांचे पिकनिहाय प्रति चौ. मीटर रोपांची किमान संख्या खालीलप्रमाणे शिफारशीनुसार असल्यानंतरच लागवड साहित्यासाठी अनुदान देय राहील.

| अ.क्र. | पिकांचे नाव | वाफ्यावरील लागवडीचे अंतर (मी.) | प्रति चौ. मी. रोपे संख्या |
|---|---|---|---|
| १ | सिमला मिरची | ०.६० X ०.४५ | ३.७० |
| २ | टोमॅटो | ०.६० X ०.४५ | ३.७० |
| ३ | चेरी टोमॅटो | ०.६० X ०.४५ | ३.७० |
| ४ | मिरची | ०.६० X ०.४५ | ३.७० |
| ५ | ब्रोकोली | ०.४५ X ०.३० | ७.४० |
| ६ | रेड कॅबेज | ०.४५ X ०.३० | ७.४० |
| ७ | लेट्युस | ०.४५ X ०.३० | ७.४० |
| ८ | काकडी | १.३० X ०.४० | १.९२ |
| ९ | खरबूज | १.३० X ०.४५ | १.९२ |

(उदा.१००० चौ. मी. मध्ये सिमला मिरचीचे ३७०० रोपे असणे आवश्यक आहे. याप्रमाणे विविध आकाराच्या शेडनेटगृह/ हरितगृहातील पिकनिहाय रोप संख्या उपरोक्त शिफारशीप्रमाणे असल्याची खात्री तपासणी अधिकाऱ्याने करावी).

हरितगृहामधील वर नमूद भाजीपाला पिकांव्यतिरिक्त उच्च दर्जाच्या फुलपिकांच्या (ॲन्थुरियम (कोको शेलमध्ये), ऑर्किड (कोको शेलमध्ये), कार्नेशन व जरबेरा) लागवडीसाठी कमीत कमी १००० चौ.मी. व जास्तीत जास्त ४००० चौ.मी. क्षेत्र मर्यादेत फुलपिकनिहाय लागवड साहित्यासाठी खालीलप्रमाणे अनुदान देय राहील.

हरितगृहामध्ये फुलपिकांच्या लागवड साहित्य खर्चाचे मापदंड:

| फुलपिकाचे नाव | प्रति चौ.मी. क्षेत्रासाठी लागवड साहित्य खर्च (रु.) | क्षेत्र मर्यादा (चौ. मी.) | आर्थिक मापदंड रु. | देय अनुदान मर्यादा रु. (आर्थिक मापदंडाच्या ५० % अथवा प्रत्यक्ष खर्चाच्या ५० % यापैकी जे कमी असेल ते अनुदान ग्राह्य) |
|---|---|---|---|---|
| कार्नेशन व जरबेरा (आधार देण्याच्या खर्चासह) | ४९० | १००० | ४,९०,००० | २,४५,००० |
| | | २००० | ९,८०,००० | ४,९०,००० |
| | | ३००० | १४,७०,००० | ७,३५,००० |
| | | ४००० | १९,६०,००० | ९,८०,००० |
| ॲन्थुरियम व ऑर्किड (कोको शेलमध्ये ) | ५३९ | १००० | ५,३९,००० | २,६९,५०० |
| | | २००० | १०,७८,००० | ५,३९,००० |
| | | ३००० | १६,१७,००० | ८,०८,५०० |
| | | ४००० | २१,५६,००० | १०,७८,००० |

हरितगृहामधील फुलपिकांच्या उच्च मुल्यांकित लागवड साहित्यामध्ये कार्नेशन, जरबेरा, ॲन्थुरियम (कोको शेलमध्ये), ऑर्किड (कोको शेलमध्ये) या फुलपिकांसाठी फुलपिकनिहाय प्रति चौ. मीटर रोपांची किमान संख्या खालीलप्रमाणे शिफारशीनुसार असल्यानंतरच लागवड साहित्यासाठी अनुदान देय राहील.

| अ.क्र. | पिकांचे नाव | प्रति चौ. मी. रोप संख्या |
|---|---|---|
| १ | कार्नेशन | २४ ते ३६ |
| २ | जरबेरा | ६ ते ८ |
| ३ | ॲन्थुरियम (कोको शेलमध्ये) | ७ ते १० |
| ४ | ऑर्किड (कोको शेलमध्ये) | १७ ते २० |

- भाजीपाला पिकाच्या रोपांची खरेदी खात्रीशीर स्त्रोताकडून करून शिफारशीनुसार त्याची लागवड शेडनेटगृह/ हरितगृहामध्ये करणे लाभार्थींना बंधनकारक राहील.
- हरितगृहामध्ये फुलपिकांच्या लागवड साहित्याची (वाणांची) खरेदी स्वामीत्वधन भरलेल्या (रॉयल्टी) रोपवाटीका धारकांकडूनच करून शिफारशीनुसार त्याची लागवड हरितगृहामध्ये करणे लाभार्थींना बंधनकारक राहील.
- प्रकल्पांतर्गत हरितगृह किंवा शेडनेटगृहामध्ये लागवड साहित्याचा लाभ शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सुरवातीला लागवड केलेल्या पिकासाठी एकदाच देय राहील.
- दुसऱ्यांदा कोणत्याही पिकासाठी प्रकल्प कालावधीमध्ये सदर शेतकऱ्यास पुन्हा लाभ देय राहणार नाही. हरितगृह व शेडनेटगृहाच्या आकारमानानुसार क्षेत्र ग्राह्य न धरता हरितगृह व शेडनेटगृहामधील प्रत्यक्ष लागवडीखालील क्षेत्रासाठी अनुदान देय राहील.

**लागवड साहित्य या बाबीसाठी तपासणी (मोजमाप) पध्दत:**

हरितगृह/ शेडनेटगृहामध्ये लागवड साहित्य या बाबीसाठी भाजीपाला व फुलपिके यांचे खर्चाचे मापदंड उपरोक्त प्रमाणे प्रति चौ.मी क्षेत्रासाठी देण्यात आलेले आहेत. याबाबीची क्षेत्रिय स्तरावर मोका तपासणी करताना प्रत्यक्षात जेवढया क्षेत्रावर (चौ.मी. मध्ये) लागवड झालेली आहे तेवढयाच क्षेत्राचे मोजमाप घेवून त्याप्रमाणे अनुदानाची परिगणना करण्यात यावी. त्याचप्रमाणे उपरोक्त भाजीपाला व फुलपिके यासाठी देण्यात आलेल्या खर्च मापदंडाच्या तक्त्यामध्ये बाबनिहाय मापदंडाची विगतवारी देण्यात आलेली आहे. अनुदानाची परिगणना करताना संबंधीत बाबीवर उपरोक्त तक्त्यात देण्यात आल्याप्रमाणे अधिकतम खर्च मर्यादा राहील. एका बाबीवरील झालेला जास्तीचा खर्च दुसऱ्या बाबीवर गृहीत धरण्यात येवू नये. तसेच तक्त्यात दिल्याप्रमाणे लाभार्थ्याने प्रत्यक्षात ज्या बाबी राबविलेल्या आहेत, त्याच बाबी अनुदानाची परिगणना करताना गृहीत धरण्यात याव्यात.

**अंमलबजावणीची कार्यपद्धती : अंमलबजावणीतील विविध स्तरावरील जबाबदाऱ्या:**

**लाभार्थी**

१. इच्छूक शेतकऱ्यांनी प्रकल्पाच्या संकेतस्थळावर किंवा मोबाईल ॲप्लिकेशन द्वारे नोंदणी करून हमीपत्रासह ऑनलाईन अर्ज करावा व सोबत आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत.

२. लाभार्थी सदर घटकाची अंमलबजावणी संयुक्त मालकीच्या क्षेत्रावर करत असल्यास, इतर खातेदारांचे ना हरकत प्रमाणपत्र अपलोड करावे.

३. लाभार्थ्यांनी हरितगृह/ शेडनेटगृहामधील लागवड साहित्य या घटकाच्या निकषांबाबत स्थानिक कृषि अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शन/ सूचना घेऊन सदर काम करावयाचे आहे.

४. हरितगृह/ शेडनेटगृहामधील लागवड साहित्य या घटकाकरिता पूर्वसंमती मिळालेल्या तारखेपासून शेतकऱ्यांनी ६० दिवसांच्या आत लागवड करून डीबीटी पोर्टलद्वारे अनुदान मागणी करणे बंधनकारक आहे अन्यथा देण्यात आलेली पूर्वसंमती रद्द करण्यात येईल.

५. भाजीपाला पिकांसाठी लागवड साहित्य (रोपे) व प्लॅस्टिक आच्छादन व्यतिरिक्त गादी वाफे तयार करणे, विद्राव्य खते व पिक संरक्षण या बाबी तसेच फुलपिकांसाठी लागवड साहित्य व्यतिरिक्त गादी वाफे तयार करणे, विद्राव्य खते व पिक संरक्षण या बाबी **शेतकऱ्याने स्वतः करावयाच्या आहेत**.

६. हरितगृह/ शेडनेटगृहामधील लागवड साहित्य या घटकाचे काम झाल्यानंतर ऑनलाईन अनुदान मागणी करताना मूळ देयक संकेतस्थळावर अपलोड करावे.

७. प्रकल्प स्थळी **दर्शनी भागात** (४ X ३ फुट) फलक लावून त्यावर "नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या अर्थसहाय्याने" असे नमूद करुन शेतकऱ्याचे नाव, गाव, सर्व्हे नं., हरितगृह/ शेडनेटगृहाचे आकारमान, पिकाचे नाव, क्षेत्र, वर्ष व एकुण खर्च रक्कम इत्यादी तपशील नमूद करावा.

**ग्राम कृषि विकास समिती (GKVS)**

१. इच्छुक लाभार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज प्राप्त झाल्यानंतर कागदपत्रांची छानणी समूह सहाय्यक व सहाय्यक कृषि अधिकारी यांचे मदतीने करून अर्जाच्या पात्रते/अपात्रतेबाबत निर्णय घ्यावा. अपात्र अर्जदारांना अपात्रतेबाबत कारणासह अवगत करावे.

२. अंमलबजावणी करण्यात आलेल्या घटका अंतर्गत बाबींचे सामाजिक लेखापरीक्षण करणे.

समूह सहाय्यक

१. इच्छुक लाभार्थी यांना ऑनलाईन अर्ज व प्रकल्पाच्या संकेतस्थळावर किंवा मोबाईल ॲप्लिकेशन द्वारे नोंदणी करण्यासाठी मार्गदर्शन व मदत करणे.
२. सर्व ऑनलाईन प्राप्त अर्ज ग्राम कृषि विकास समिती समोर मान्यतेसाठी सादर करणे व बैठकीचे इतिवृत्त व फोटो संकेतस्थळावर अपलोड करणे.
३. लाभार्थ्याच्या अर्जामध्ये त्रुटी आढळून आल्यास सदर अर्ज लाभार्थ्याच्या लॉगीनवर परत करून त्याबाबत संबंधित शेतकऱ्यांना त्रुटी पूर्ततेसाठी मदत करणे.
४. लाभार्थ्यांस हरितगृह/ शेडनेटगृहामधील लागवड साहित्य या घटकाच्या अटी, शर्ती व अंमलबजावणी बाबत समजावून सांगणे.

सहाय्यक कृषि अधिकारी

१. लाभार्थीचा ऑनलाईन अर्ज व सोबत सादर केलेल्या सर्व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे.
२. ग्राम कृषि विकास समितीने (GKVS) मान्यता दिलेल्या लाभार्थ्यांच्या कागदपत्रांच्या छानणी आधारे नियोजित प्रकल्प स्थळाची पाहणी करुन प्रकल्प स्थळ संबंधित घटकासाठी योग्य आहे किंवा नाही, याची पडताळणी करणे. तसेच लाभार्थ्याने घटकाचा लाभ नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प अथवा इतर शासकीय योजनेतून घेतला आहे काय, याबाबत खात्री करावी.
३. स्थळ पाहणी दरम्यान डीबीटी पोर्टलवरील डेस्क-२ मध्ये उपलब्ध करून दिलेला अहवाल आवश्यक खातरजमा करून भरावा.
४. प्रकल्पाच्या मोबाईल ॲप्लिकेशन द्वारे नियोजित प्रकल्प स्थळाचे अक्षांश/ रेखांशासह भौगोलिक स्थानांकन (Geo-tagging) करून फोटो अपलोड करावेत.
५. प्राप्त झालेल्या अर्जामध्ये काही त्रुटी असल्यास या त्रुटींची संबंधित शेतकऱ्याकडून लगेच पूर्तता करून घ्यावी.

उप कृषि अधिकारी

१. सदर घटकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व्यापक स्वरुपात प्रचार व प्रसिद्धी करणे.
२. लाभार्थ्यांना तांत्रिक मार्गदर्शन करणे.
३. मोका तपासणी वेळी तपासणी अधिकारी यांचे समवेत उपस्थित राहून सहाय्य करणे.

उपविभागीय कृषि अधिकारी

१. लाभार्थ्याचा प्राप्त अर्ज, अर्जासोबत अपलोड केलेली कागदपत्रे, ग्राम कृषि विकास समितीचे फोटोसह बैठकीचे इतिवृत्त, डेस्क-२ वरील स्थळ पाहणी अहवाल व फोटो यांची छानणी करणे.
२. सदर लाभार्थ्याने घटकाचा लाभ नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प अथवा इतर कोणत्याही शासकीय योजनेतून घेतला आहे काय, याची खातरजमा करणे.
३. छानणी अंती लाभार्थी पात्र ठरत असल्यास लाभार्थ्यास पूर्वसंमती प्रदान करणे.
४. छानणी अंती अर्जामध्ये त्रुटी आढळून आल्यास सदर अर्ज त्रुटी पूर्ततेसाठी त्रुटी नमूद करून डीबीटी प्रणालीद्वारे मागील डेस्क वर पाठविण्यात यावे.

५. लाभार्थी योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार पात्र ठरत नसल्यास सदरील अर्जास पूर्वसंमती नाकारण्यात यावी.
६. लाभार्थीने हरितगृह/ शेडनेटगृहामधील लागवड साहित्य या घटकाचे काम पूर्ण झालेचे ऑनलाईन अवगत केल्यानंतर घटक राबविलेल्या जागेचे शेतकरी/ शेतकरी प्रतिनिधी यांचे समवेत प्रकल्प स्थळाचे अक्षांश/ रेखांशसह प्रकल्पाच्या मोबाईल ॲप्लिकेशन द्वारे भौगोलिक स्थानांकन (Geo-tagging) करावे.
७. मोका तपासणी अहवाल, देयकांची साक्षांकित प्रत इत्यादी कागदपत्रे मोबाईल ॲप्लिकेशन द्वारे अपलोड करणे.
८. भाजीपाला पिकांसाठी लागवड साहित्य (रोपे) व प्लॅस्टिक आच्छादन व्यतिरिक्त गादी वाफे तयार करणे, विद्राव्य खते व पिक संरक्षण या बाबी तसेच फुलपिकांसाठी लागवड साहित्य व्यतिरिक्त गादी वाफे तयार करणे, विद्राव्य खते व पिक संरक्षण या बाबी शेतकऱ्याने स्वतः केल्या असल्याची/ करत असल्याची खात्री मोका तपासणी अधिकाऱ्याने करावयाची आहे. त्यानंतरच अनुदानासाठी शिफारस करावयाची आहे.
९. मोका तपासणीमध्ये हरितगृह व शेडनेटगृहामधील प्रत्यक्ष लागवड झालेल्या क्षेत्राचे मोजमाप घेऊन अनुदानासाठी पात्र क्षेत्राचीच निर्धारित केलेल्या खर्च मापदंडाप्रमाणे अनुदानासाठी परिगणना करून प्रकरण पुढील डेस्क वर पाठविणे.
१०. मोका तपासणी दरम्यान त्रुटी आढळून आल्यास त्रुटी नमूद करून प्रकरण लाभार्थी स्तरावर त्रुटी पूर्ततेसाठी परत पाठविणे.
११. आपल्या कार्यक्षेत्रात सदर घटकाची अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांप्रमाणे होत आहे याची वेळोवेळी पडताळणी करणे.

उपविभाग स्तर (लेखाधिकारी)

१. मोका तपासणी अधिकारी यांचेकडून प्राप्त प्रस्ताव व तपासणी अहवालाची छानणी करणे.
२. मोका तपासणी अधिकारी यांनी प्रस्तावित केलेल्या अनुदान रकमेची पडताळणी करून योग्य असल्याबाबत खातरजमा करणे.
३. छानणी अंती प्रस्ताव परिपूर्ण असल्यास अनुदान अदायगीसाठी शिफारस करून पुढील डेस्कवर पाठविणे.
४. छानणी दरम्यान प्रकरणामध्ये त्रुटी आढळून आल्यास डीबीटी प्रणालीवर त्रुटी नमूद करून मागील डेस्क वर त्रुटी पूर्ततेसाठी परत पाठविणे.

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी

१. अनुदान प्रस्तावाची संपूर्ण छानणी करावी व शिफारशीत करण्यात आलेले अनुदान योग्य असलेबाबत पडताळणी करणे.
२. छानणी अंती प्रस्ताव परिपूर्ण असल्यास अनुदान अदायगीस अंतिम मान्यता देणे.
३. छानणी दरम्यान त्रुटी आढळून आल्यास डीबीटी प्रणालीवर त्रुटी नमूद करून मागील डेस्क वर त्रुटी पूर्ततेसाठी परत पाठविणे.

४. जिल्ह्यामध्ये लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यांसह सदर घटकाची अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांप्रमाणे होत आहे, याची वेळोवेळी पडताळणी करणे. विहित केल्याप्रमाणे पर्यवेक्षीय तपासणी पूर्ण करणे.

**विभागीय कृषि सहसंचालक:**

१. विभागामध्ये लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यांसह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करणे.
२. विभागस्तरावर सदर घटक राबविलेल्या गावांना भेटी देऊन पर्यवेक्षीय तपासणी करणे.
३. सदर घटकाची अंमलबजावणी व सनियंत्रण करणे.

**क्षेत्रीय पर्यवेक्षीय तपासणी** – योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व गुणवत्ता नियंत्रणासाठी क्षेत्रीय स्तरावरून पर्यवेक्षीय तपासणी करणे आवश्यक आहे.त्या अनुषंगाने योजनेची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणात किमान तपासणी करण्यात यावी.

| अ.क्र. | तपासणी अधिकारी पदनाम | तपासणीची टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | किमान १ प्रकरण प्रति माह | |
| २ | विभागीय कृषि सहसंचालक | किमान १ प्रकरण प्रति माह | |

# मोका तपासणी अहवाल

## हरितगृह / शेडनेटगृहातील लागवड साहित्य

१. तपासणी दिनांक : ......../......./..................

२. तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव:- श्री. ........................................................... उविकृअ .....................

३. लाभार्थ्याचे नाव :- श्री. / श्रीमती ..........................................................................................................

गांव ..............................    ता. ............................ जि. ..............................

फार्म आय डी. .................................. सर्व्हे नं. ...........................

वर्गवारी- (अ.जा./अ.ज./सर्वसाधारण). .....................................

४. पूर्वसंमती क्र.:........................................व दिनांक ................... पूर्वसंमती दिलले क्षेत्र.................. चौ.मी.

५. बाब- हरितगृह / शेडनेटगृहातील................................................. पिकाचे लागवड साहित्य (लागवड केलेल्या पिकाचे नाव नमूद करावे)

**६. क्षेत्रफळ मोजमाप**

६.१ एका गादी वाफ्याची लांबी (मी.) =.................... ('अ')

६.२ एका गादी वाफ्याची रुंदी (मी.) =.................... ('ब')

६.३ एका गादी वाफ्याचे क्षेत्रफळ = अ X ब चौ.मी. = चौ.मी.................... ('क')

६.४ एकुण गादी वाफ्यांची संख्या = ............ ('ड')

६.५ एकुण लागवडीखालील अनुदान पात्र क्षेत्र = क X ड चौ.मी.= ...................... चौ.मी. ('इ')

७. हरितगृहातील/ शेडनेटगृहातील संबंधीत पिकाची प्रति चौ. मी. रोपे संख्या = शिफारशीत...............प्रत्यक्षात..............

**८. खर्च मापदंडाची परिगणना**

**८.१. भाजीपाला (हरितगृह/ शेडनेटगृह)**

| अ.क्र. | बाब | प्रति चौ.मी. क्षेत्रासाठी मंजूर खर्च मापदंड (रु.) | प्रत्यक्ष खर्च प्रति चौ.मी. (रु.) | स्तंभ क्र. ३ व ४ यापैकी कमी असलेली रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | लागवड साहित्य (रोपे) | १८ | | |
| २ | प्लास्टिक अच्छादन | १४ | | |
| **एकूण** | | **३२** | | **(फ )** |

८.२. फुल पिके (हरितगृह)

| अ. क्र. | बाब | प्रति चौ.मी. क्षेत्रासाठी मंजूर खर्च (रु.) | | प्रत्यक्ष खर्च प्रति चौ.मी. (रु.) | स्तंभ क्र. ३/४ व ५ यापैकी कमी असलेली रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| | | कार्नेशन व जरबेरा | ॲन्थुरीयम व ऑर्किड | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | लागवड साहित्य (रोपे) | ४९०<br>(आधार देण्याच्या खर्चासह) | ५३९ | | |
| एकूण | | ४९० | ५३९ | | (फ) |

९. देय अनुदानाची परिगणना

९.१ उपरोक्त तक्त्यातील **“फ”** प्रमाणे प्रति चौ.मी. खर्च ग्राहय धरुन अनुदान रक्कम (रु.) = (इ X फ ) ÷ २ = ................रु. उपरोक्तप्रमाणे रक्कम रु................... अक्षरी ........................................................................................ ...................................... अर्थसहाय्य देणेबाबत शिफारस करण्यात येत आहे.

लाभार्थ्याची/ लाभार्थी प्रतिनिधीचे नाव व स्वाक्षरी

(श्री. )

स्वाक्षरी-------------------------

उपविभागीय कृषि अधिकारी ---------------------

(श्री. )

दिनांकित स्वाक्षरी

## पर्यवेक्षीय तपासणी अहवाल

## हरितगृह / शेडनेटगृहातील लागवड साहित्य

१. तपासणी दिनांक :  ........../......./.................

२. तपासणी करणा-या अधिका-याचे नाव:- श्री./श्रीमती............................................................ पदनाम .....................

३. तपासणी वेळी उपस्थित इतर अधिकारी-

१. श्री./श्रीमती................................................................................ पदनाम ...........................

२. श्री./श्रीमती ................................................................................ पदनाम ...........................

४. लाभार्थ्याचे नाव :- श्री./श्रीमती ..................................................................................................

गांव ..............................    ता. ............................ जि. ..............................

फार्म आय डी. .................................. सर्व्हे नं. ...........................

वर्गवारी- (अ.जा./अ.ज./सर्वसाधारण). .....................................

५. बाब- हरितगृह / शेडनेटगृहातील................................................ पिकाचे लागवड साहित्य (लागवड केलेल्या पिकाचे नाव नमूद करावे)

६. पूर्व संमती क्र. ................. दिनांक ................... पूर्व संमती दिलेले क्षेत्र ................... चौ.मी.

७. कामाचा कालावधी: ......................

८. प्रकल्पाचा तपासणी तपशील

८.१ एका गादी वाफ्याची लांबी (मी.) =.................... ('अ')

८.२ एका गादी वाफ्याची रुंदी (मी.) =.................... ('ब')

८.३ एका गादी वाफ्याचे क्षेत्रफळ = अ X ब चौ.मी. = चौ.मी.................... ('क')

८.४ एकुण गादी वाफ्यांची संख्या = ............ ('ड') चौ.मी.

८.५ एकुण लागवडीखालील पात्र क्षेत्र = क X ड चौ.मी.= ...................... चौ.मी. ('इ')

९. हरितगृहातील/ शेडनेटगृहातील संबंधीत पिकाची प्रति चौ. मी. रोपे संख्या = शिफारशीत...............प्रत्यक्षात...............

१०. लाभार्थी शेतकऱ्यास देण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम रु. ..........................

११. लागवड पश्चात मोका तपासणीमध्ये अर्थसहाय्याची परिगणना बरोबर केलेली आहे काय?    होय/नाही

११.१ नसल्यास तफावत रक्कम रु. ................

१२. हरितगृह/ शेडनेटगृहामध्ये मार्गदर्शक तांत्रिक निकषानुसार भाजीपाला/ फुलपीक लागवड करण्यात आलेली आहे काय ?

होय/नाही

**(बिलाप्रमाणे सर्व लागवड साहित्य मोक्यावर वापरण्यात आलेले आहे काय? याची तपासणी करावी.)**

१३. हरितगृह/ शेडनेटगृहामधील लागवड साहित्याबाबत लाभार्थी शेतकऱ्याचे सर्वसाधारण अभिप्राय :

(आर्थिकदृष्ट्या किफायतशीरपणा, तंत्रज्ञान उपयुक्तता . . . )

१४. हरितगृह/ शेडनेटगृहामधील लागवड साहित्याच्या गुणवत्तेबाबत तपासणी अधिका-याचे अभिप्राय :

(सध्याचा वापर, शेतकऱ्याला असलेले तांत्रिक ज्ञान)

**तपासणी अधिकारी, श्री. ................................................................... पदनाम ............................... (स्वाक्षरी)**

**इतर अधिकारी श्री. . ....................................................................... पदनाम ............................... (स्वाक्षरी)**

**लाभार्थ्याची / लाभार्थी प्रतिनिधीची स्वाक्षरी ...............................................(नाव ...........................................)**